# मुंबई पोलीस कायदा : १९५१

मुंबई पोलस कायदा **०१ ऑगस्ट १९५१** रोजी अंमलात आला. नंतर मुंबई राज्याचे विभाजन होवून महाराष्ट्राची निर्मीती झाली. ०१ मे १९६० पासुन हा कायदा याच नावाने सर्व महाराष्ट्रास लागू करण्यात आला आहे.

**कलम ०२** :- व्याख्या **३)**सक्षम अधिकारी-पोलीस आयुक्त,जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक दर्जाचे अधिकारी **४)**पोलीस शिपाई-कनिष्ठ दर्जाचा पोलीस अधिकरी **५-अ)**खाद्यगृह **९)**सार्वजनिक मनोरंजनाचे ठिकाण **१०)**सार्वजनिक करमणुकीचे ठिकाण **११)**पोलीस अधिकारी-पोलीस दलातील कोणत्याही दर्जाची व्यक्ती तसेच कलम २१ व २२ प्रमाणे नेमलेले विशेष पोलीस अधिकारी **१३)**सार्वजनिक ठिकाण/जागा.

**कलम १४** :- नेमणुकीचा दाखला (पो.नि.पासून खालच्या दर्जाच्या पो. अधिकाऱ्यास दिलेला)

**कलम २८** :- पोलीस अधिकारी हे **२४ तास** कर्तव्यावर आहेत असे समजावे (निलंबन व रजा खेरीज)

**कलम ३३** :- सार्व. ठिकाणी रहदारीचे नियमन व का. व सुव्यवस्था राखण्यासाठी नियम करण्याचे अधिकार (पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांना त्याचे कार्यक्षेत्रामध्ये या कायद्यास सुसंगत असतील असे सर्व नियम करण्याचा अधिकार आहे) शिक्षा - १३१ नुसार

**कलम ३६** :- पो. आयुक्त किंवा अधिक्षक व इतर पो. अधिकारी यांचे लोकांना मिरवणूक संदर्भात निर्देश देण्याचा अधिकार (पो.नि.हून कमी दर्जा नसलेला अधिकारी त्यांचे कार्यक्षेत्रातील लोकांना काय करावे या बाबत निर्देश देवू शकतील) शिक्षा-१३४ नुसार

**कलम ३७** :- सार्वनिक शांततेस भंग करणाऱ्या कृतींना मनाई करण्याचा अधिकार (आयुक्त व दंडाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात विवक्षीत कृतींना मनाई करण्याचा अधिकार आहे)(या अधिकारानुसार मिरवणुकीचा वेळ १५ दिवसांपर्यंत वाढविता येते) (या कलमाचे शिक्षा कलम **१३४** हे आहे) शिक्षा-१३५ नुसार

**कलम ३७ (२)** :- वरील आदेशाची बजावणी करताना साहित्य जप्त करण्याचा अधिकार.

**कलम ३७ (३)** :- शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी १५ दिवसांपर्यंत जमावबंदी आदेश काढण्याचा अधिकार (१५ दिवसांपेक्षा जास्त हवा असल्यास राज्य शासनाची परवानगी लागते)

**कलम ३७ (४)** :- सा. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी प्रवेशबंदी आदेश काढण्याचा अधिकार. कलम ३७ चे भंग केल्यास शिक्षा कलम-१३५ आहे.

**कलम ३८** :- गाणे बजावणे किंवा गोंगाटास मनाई करण्याचा अधिकार (जिल्हा दंडाधिकारी / पोलीस आयुक्त / पो. अधिक्षक यांना वरील प्रमाणे मनाई करण्याचा आदेश काढण्याचा अधिकार आहे) या कलमाचे शिक्षा कलम १३६ आहे.

**कलम ४१** :- १) गर्दीचे ठिकाणी किंवा सभेच्या ठिकाणी अव्यवस्था बद्दल पोलीसांनी बंदोबस्त करण्याचा व तेथील गर्दीचे नियमन करण्याचा पोलीसांना अधिकार आहे. २)तसेच असे नियमन करण्याकरीता पोलीसांना कोणत्याही गर्दीचे ठिकाणी किंवा सभेच्या ठिकाणी प्रवेश करण्याचा अधिकार आहे. या कलमाचे शिक्षा कलम १३७ आहे.

**कलम ५५** :- टोळयांना किंवा जमाव यांना हद्दपार करण्याचा अधिकार. (जिल्हा दंडाधिकारी, पो.आयुक्त, अधीक्षक व शासनाने विशेष अधिकार प्रदान केलेला उप वि. दंडाधिकारी कार्यक्षेत्रातील कोणत्याही टोळीस किंवा जमावास हद्दपार करु शकेल)

**कलम ५६** :- अपराध करणाऱ्या व्यक्तींना हद्दपार करण्याचा अधिकार (जिल्हा दंडाधिकारी, पो. आयुक्त, शासनाने विशेष अधिकार प्रदान केलेला उप वि. दंडाधिकारी कार्यक्षेत्रातील **१)**जनतेच्या जिवीतास धोका निर्माण करणारी व्यक्ती **२)**भादवि प्रकरण १२, १६ किवां १७ मधील गुन्हे सतत करीत असणारी किंवा करण्याच्या बेतातील व्यक्ती **३)**जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारी असेल **४)**साथीचा रोग असलेली व्यक्तींना हद्दपार करण्याचा अधिकार आहे. सदर व्यक्ती जेथे राहत असेल तेथील सर्वात जवळच्या पो. ठाण्यात आपल्या राहण्याचे ठिकाण कळविल. तसेच राज्यातुन बाहेर गेल्यास १० दिवसांच्या आत डाकेने किंवा तारेने कळवेल तसेच परत आल्यावरही १० दिवसांच्या आत कळवेल.

**कलम ५७** :- सिद्ध अपराधी व्यक्तींना हद्दपार करण्याचा अधिकार. (जिल्हा दंडाधिकारी, पो. आयुक्त, शासनाने विशेष अधिकार प्रदान केलेला उप वि. दंडाधिकारी) **अ-१)** भादवि मधील प्रकरण १२, १६, १८ मधील गुन्हे **अ-२)**मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५,६६अ,६८ नुसार **अ-३)**महिला/मुली अनैतिक व्यापार अधिनियम कलम ०३ख०४,०५,०६,०९ नुसार **अ-४)**सिमा शुल्क अधिनियम कलम १३५ नुसार **अ-५)**मुं.जु.का. कलम ०४, १२अ नुसार दोषी ठरविण्या आले असेल. किंवा **ब)**मुंबई दारुबंदी अधिनियमाखाली कलम ६५, ६६अ, ६८ शिवाय अन्य अपराधाबद्दल ०२ वेळा दोषी ठरविण्यात आलेली व्यक्ती. **ब-१)**रेल्वे मालमत्ता अधिनियम कलम ०३,०४ खाली ०२ वेळा दोषी ठरविण्यात आले असेल **ब-२)**BP Act कलम १२२, १२४ खाली ०३ वेळा दोषी ठरविण्यात आले असल्यास अशा व्यक्तींना जिल्हा दंडाधिकारी, पो. आयुक्त, शासनाने विशेष अधिकार प्रदान केलेला उप वि. दंडाधिकारी हे हद्दपार करु शकतात. सदर व्यक्ती जेथे राहत असेल तेथील सर्वात जवळच्या पो. ठाण्यात आपल्या राहण्याचे ठिकाण कळविल. तसेच राज्यातुन बाहेर गेल्यास १० दिवसांच्या आत डाकेने किंवा तारेने कळवेल तसेच परत आल्यावरही १० दिवसांच्या आत कळवेल.

**कलम ५७ (अ)** :- भीक मागणाऱ्या व्यक्तींना हद्दपार करण्याचा अधिकार. (जिल्हा दंडाधिकारी व पो. आयुक्त यांना भीक मागण्याबाबत प्रतिबंधक कायद्यान्वये बंदी असलेल्या शहरामध्ये भीक मागणाऱ्या व्यक्तींना हद्दपार करता येते)

**कलम ६२** :- हद्दपार केलेली व्यक्ती न गेल्यास किंवा मुदतीपुर्वी परत आल्यास कार्यवाही. (या कायद्याच्या कलम ५५, ५६, ५७ व ५७ अ अन्वये हद्दपार केलेली कोणतीही व्यक्ती निघून जाण्यास कसुरी करील किंवा मुदतीपुर्वी प्रवेश करील तेंव्हा पोलीस अधिकारी सदर व्यक्तीस अटक करुन हद्दीबाहेर सोडता येईल) (तसेच अशा व्यक्तीस अल्प कालावधीकरीता येण्याची जामीनासह परवानगी देता येईल तसेच दिलेली परवानगी केंव्हाही नामंजूर करता येईल)

**कलम ६३ (अ)** :- संचालन किंवा मिरवणूक किंवा शिबीरे, सभा इ. मनाई करण्याचा अधिकार. (राज्य शासनास राज्यातील कोणत्याही ठिकाणी लष्करी कवायत वगैरेचे प्रशिक्षण देणे संदर्भात कोणत्याही संघटनेवर बंदी घालता येईल तसेच लष्करी दल किंवा पोलीस दला सारखा गणवेश वापरण्यावर बंदी घालता येईल) या कलमाचे शिक्षा **कलम १५३** हे आहे.

पोलीसांचे अधिकार व कर्तव्ये.

**कलम ६४** :- पोलीस अधिकाऱ्यांची कर्तव्ये. १)समन्स बजावणे २)शासनाचे आदेश पाळणे ३)वरीष्ठांनी दिलेले आदेश अंमलात आणणे ४)गुन्हयास आळा बसावा या उद्देशाने माहीती मिळविणे व वरीष्ठांना कळविणे ५)सार्वजनिक उपद्रव्यास आळा घालणे ६)कायदेशीर आदेश पारीत झालेल्या व्यक्तीस अटक करणे ६)दुस-या पोलीस अधिकाऱ्यास मदत करणे ७)कायद्यानुसार सोपविण्यात आलेले कार्य पार पाडणे.

**कलम ६५** :- सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करण्याचा व झडती घेण्याचा अधिकार. (कलम ६४ मध्ये सांगीतलेली कर्तव्ये पार पाडताना कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, दारुचा गुत्ता, मादक पदार्थ विक्री करण्याचे ठिकाणामध्ये वॉरंटाशिवाय प्रवेश करता येईल) (तसेच संशयीत व्यक्तीची वॉरंटाशिवाय झडती घेता येईल)

**कलम ६६** :- पोलीस अधिकाऱ्यांची जनतेसंबंधी सामाजिक कर्तव्ये. १)अपंगांना रस्ता ओलांडण्यास मदत २)दारुच्या नशेतील किंवा वेड्या व्यक्तीला ताब्यात घेणे ३)आजारी किंवा जखमी व्यक्त्तिस अटक केल्यानंतर वैद्यकीय मदत देणे ४)आरोपीस योग्य अन्न व आश्रय देणे ५)झडती घेताना सभ्यतेने वागणे ६)स्त्रीया व मुलांशी सभ्यतेने वागणे ७)आगीमुळे नुकसान होवू नये म्हणून प्रयत्न करणे ७)अपघात किंवा संकट टाळण्यासाठी शिकस्त करणे.

**कलम ६७** :- पोलीसांनी रस्त्यावरील वाहतूकीचे नियमन करणे. (रहदारीचे नियमन, नियंत्रण, अडथळे दूर करणे, रस्त्यावर किंवा पाण्याच्या जागी किंवा नदीकाठी किंवा मंदीर किंवा प्रार्थना ठिकाणी बंदोबस्त करणे, लोकांची गर्दी होवून का. व सु. प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता)

**कलम ६८** :- पोलीसांचे वाजवी आदेश पाळण्याचे लोकांवर बंधन असते. या कलमाचा भंग केल्यास कलम १४० प्रमाणे शिक्षा होते.

**कलम ६९** :- पोलीसांचा आदेश न पाळल्यास अटकावून ठेवता येईल व कारण संपल्यानंतर सोडून देता येईल किंवा दंडाधिकाऱ्यासमोर हजर करता येईल.

**कलम ७०** :- या कायद्याच्या कलम ३७,३८,३९ चा भंग केल्यास अटक करण्याचा अधिकार आहे. तसेच त्यांचेकडील संबंधीत कोणतीही वस्तु जप्त करण्याचा अधिकार आहे.

**कलम ७१** :- हद्दपार, तडीपार कलम ४३, ५५, ५६, ५७अ, ६३ चा आदेशाची अंमलबजावणी करताना सदर आदेशाचे पालन न करणाऱ्या संबंधीत व्यक्तीस अटक करण्याचा पोलीसांना अधिकार आहे.

**कलम ७२** :- पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय अटक केंव्हा करू शकतील. १)कलम १२१ प्रमाणे आगीची खोटी माहीती दिल्यास २)कलम ४३,५५,५६,५७अ,६३अ चा भंग केल्यास ३)कलम १२२ व १३६ प्रमाणे अपराध केल्यास.

**कलम ७३** :- प्राण्यांना क्रुरपणे वागणूक देण्यास प्रतिबंध कायदा १९६० अन्वये गुन्हा केल्यास कोणत्याही व्यक्तीस वॉरंटाशिवाय अटक करण्याचा पोलीसांना अधिकार आहे.

**कलम ७९** :- पोलीस अधिकाऱ्यांसमोर विशिष्ट गुन्हे घडल्यास वॉरंटाशिवाय अटक करण्याचा अधिकार. (कलम ११७ , १२५, १३०, १३१, १३५ प्रमाणे गुन्हा केल्यास)

**कलम ८०** :- अटक करण्यासंबंधी इतर अधिकार. १)कलम ११०-सार्वनिक ठिकाणी बीभत्स वर्तन केल्यास २)कलम १२०-सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्यास.

**कलम ८१** :- पोलीसांसमारे अदखलपात्र अपराध घडत असल्यास व तो थांबविण्यास पोलीसांनी ताकीद दिल्यानंतरही अपराध करण्याचे चालु ठेवल्यास किंवा पोलीसाने सोबत पोलीस ठाण्यास येण्यास सांगीतले असता येण्यास नकार दिल्यास वॉरंटाशिवाय अटक करण्याचा अधिकार.

**कलम ८२** :- बेवारस मालमत्ता पोलीसांनी ताब्यात घेण्याचा अधिकार.

**कलम ९९** :- रस्त्यासंबंधीचे नियम न पाळणे.

**कलम १०८** :- सार्वजनिक विहीर वगैरे मधील पाणी दुषीत करणे.

**कलम ११०** :- लोकांसमोर असभ्य वर्तन करणे.

**कलम ११२** :- शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने गैरवर्तन करणे.

**कलम ११५** :- रस्त्यात किंवा रस्त्याजवळ उपद्रव करणे. (रोड लगत लघवी करणे, लहान मुलांन मलमुत्र करणे, रोडवर थुकणे, करे कचरा टाकणे)

**कलम ११६** :- सार्वजनिक इमारतीतील नोटीसकडे दुर्लक्ष करणे.

**कलम ११७** :- कलम ९९ ते ११६ पर्यत सांगीतलेले अपराध केल्यास १२०० रु. द्रव्यदंड.

**कलम ११८** :- गुरे वगैरे सुर्यास्त व सुर्योदय या पुढील ०१ तास दरम्यान कोंडून ठेवण्यात कसुरी करील त्यास पहिल्या अपराधाबद्दल ०१ महिना-४०००रु व दुसऱ्यासाठी ०६ महीने-५०००रु.

**कलम ११९** :- प्राण्यांना निर्दयतेने वागविल्यास ०१ महिना किंवा २५००रु. (आयुक्त क्षेत्र सोडून)

**कलम १२०** :- जाणुनबुजून अतीक्रमण करणे. (शिक्षा-५०००रु)

**कलम १२१** :- आगीची खोटी बातमी देणे किंवा आगीच्या सुचना देणाऱ्या यंत्रास नुकसान पोहंचविल्यास ०३ महिने किंवा ३०००रु.

**कलम १२२** :- सुर्यास्त व सुर्योदय दरम्यान संशयास्पद स्थितीत सापडणे. शिक्षा : ०१ वर्ष/१०००रु

**कलम १२३** :- प्राधिकारवाचून हत्यार/शस्त्र बाळगणे. (सेना दलात/पोलीस/का.प्राधिकृत नसलेली कोणतीही व्यक्ती पोलीसाकडून निशस्त्र होण्यास पात्र असेल व दोष सिद्धीनंतर १२५०० रु दंड)

**कलम १२४** :- समाधानकारक उत्तर देता येत नसेल अशी मालमत्ता ताब्यात ठेवणे.
शिक्षा ०१ वर्षे/५०००रु.

**कलम १२६** :- चोरीचा संशय असलेली मालमत्ता ताब्यात असल्याबद्दल तारण व्यवसायी वगैरेंनी पोलीसांना माहीती न दिल्यास २००० रु. द्रव्यदंड.

**कलम १३० (अ)** :- रस्त्यावर जुगार/पैज खेळल्यास २५०० रु दंड.

**कलम १३१** :- कलम ३३ च्या आदेशाचे उल्लंघन केल्यास शिक्षा.

**कलम १३४** :- कलम ३६ चे उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा ५००० रु दंड.

**कलम १३६** :- कलम ३८ चे उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा ०३ महिने/५०००रु.

**कलम १३७** :- कलम ४१ चे उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा ५०० रु.

**कलम १४०** :- कलम ६८ चे उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा ५०० रु.

**कलम १४१** :- कलम ५५,५६,५७,५७(अ)अन्वये दिल्येल्या निर्देशांचे उल्लंघन केल्यास
शिक्षा : ०१ वर्षे+द्रव्यंदड.

**कलम १४२** :- हद्दपार केल्यानंतर परवानगीशिवाय प्रवेश केल्यास किंवा परवानगी दिल्यानंतर परत न गेल्यास किंवा स्वतः बद्दल वेळोवेळी माहीती न दिल्यास ०२ वर्षे+द्रव्यदंड.

**कलम १४३** :- कलम ६३ अन्वये तात्पूरती प्रवेश करण्याकरीता परवानगी दिलेल्या व्यक्तीने परवानगीचा भंग केल्यास ०२ वर्ष+ द्रव्यदंड.

**कलम १४३ (अ)** :- कलम ६३ (अ) अन्वये शिबीरे, संचालन, गणवेश संबंधी मनाई केलेल्या आदेशांचे उल्लंघन केल्यास ०१वर्ष+द्रव्यदंड. दुसऱ्या गुन्हयाकरीता ०३वर्ष+द्रव्यदंड.

**कलम १४५** :- पोलीस होण्याकरीता किंवा नोकरीहून मुक्त होण्याकरीता खोटे निवेदन वगैरे केल्याबद्दल शास्ती. ०३ महिने/१००रु/दोन्ही.

रजा संपल्यावर हजर होण्यास कसूर केल्यास त्याव्यक्तीने पदाची कर्तव्ये बजावण्याचे सोडून दिले आहे असे समजण्यात येईल.

**कलम १४७** :- पोलीस अधिकाऱ्याने त्रासदायक रितीने प्रवेश केल्यास, झडती घेतल्यास, अटक केल्यास ०६ महिने/५००रु/दोन्ही.

**कलम १४८** :- अटक केलेल्या व्यक्तीस दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यास विनाकारण विलंब लावल्यास (२४ तासामध्ये मॅ. समोर हजर न केल्यास) ०६ महिने/५००रु/दोन्ही.

**कलम १५१** :- पोलीस अधिकाऱ्याचा ताकीद देवून सोडून देण्याचा अधिकार.

**कलम १५९** :- कर्तव्यावर असताना सद्‌भावनापुर्वक केलेल्या कृतीस कोणताही पोलीस अधिकारी किंवा दंडाधिकारी दंड भरण्यास पात्र असणार नाही.

**कलम १६०** :- शासनाने पारीत केलेला कोणताही आदेश सद्‌भावनापुर्वक अंमलात आणल्यास कोणताही लोकसेवक दंडास किंवा शिक्षेस पात्र असणार नाही.

**कलम १६१** :- वरील प्रमाणे चुकीने घडलेल्या कृती बद्दल पोलीस अधिकारी किंवा दंडाधिकारी यांचे विरुद्ध खटला दाखल करावयाचा असेल तर ०६ महिन्याच्या आत दाखल करावा लागेल अन्यथा तो फेटळला जाईल.

**कलम १६३** :- जाहीर नोटीस कशा द्याव्यात. (या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये देणे आवश्यक असेलेली जाहीर नोटीस सक्षम अधि. सहीने, ठळक ठिकाणी, चिटकावून, दवंडी पेटवून, वृत्तपत्रामध्ये जाहीर करून प्रसिद्ध करण्यात येईल) (वरील पैकी कमीत कमी दोन माध्यमांनी)